

# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२३। पान १


# सकारात्मक कामकाजासाठी गांधी गतिमानता अभियान!

## पारदर्शक व लोकाभिमुख कामकाजाचा महापालिकेचा उद्देश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिका राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा राबवत आहे. गतिमान प्रशासन, पारदर्शक व लोकाभिमुख कामकाज, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सुलभतेने माहिती पोचविणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी महापालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांनी पूर्ण क्षमतेने सकारात्मक कामकाज करावे, असा आदेश अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिला.प्रशासना तील सेवांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणे, लोकाभिमुखता व निर्णयशीलता आणण्याकरिता तसेच सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्याकरिता 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान' राबविण्याचा सरकारचा आदेश आहे. त्याच्या अंमल बजावणीसाठी आयोजित बैठकीत खोराटे बोलत होते. शहर अभियंता मकरंद निकम दूरचित्रवाणी परिषदेद्वारे तर, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, उपआयुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, सहायक आयुक्त नीलेश देशमुख, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, लेखाधिकारी राजू जठार, प्रशासन अधिकारी मुकेश कोळप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते. गतिमानता अभियान दोन ऑक्टोबरला निश्चित केले आहे. अभियानात महापालिका गटात प्रथम क्रमांकासाठी १० लाख, द्वितीय क्रमांकासाठी सहा लाख आणि तृतीय क्रमांकासाठी चार लाख रुपयांचे बक्षीस सरकारने निश्चित केले आहे, अशी माहिती मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण यांनी दिली. महापालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या योजनांचा कृती आराखड्याचे संगणकीय सादरीकरण केले. अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी सात कार्यक्षेत्रे निश्चित केली असल्याचेही त्यांनी सांगितले.




### अभियानाची कार्यक्षेत्रे

» कार्यालयीन व्यवस्थापनात आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब

» सेवांची गुणवत्ता किंवा दर्जामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता

» लोकाभिमुखता, ई-गव्हर्नन्स, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर, तंटामुक्त कार्यालय

» नावीन्यपूर्ण व पथदर्शी स्वरूपाच्या संकल्पना किंवा प्रयोग किंवा उपक्रम

# अजित पवार कमळाच्या चिन्हावर लढणार?

## भाजपाने अनेक लोक नेत्यांना संपवल: रोहित पवार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादीचे अनेक नेते हे बंड करून भाजपासोबत सत्तेत सामील झाले आहेत. त्यातील काही नेत्यांना भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी लागू शकते, असे वक्तव्य रोहित पवार यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये केल आहे. तीच परिस्थिती अजित पवार यांच्यावरदेखील येऊ शकते का? या प्रश्नावर उत्तर देताना रोहित पवार यांनी भाजपाला लोकनेते आवडत नाहीत. भाजपाने अनेक लोक नेत्यांना संपवल आहे. त्यामुळे भाजपाने वरपासून खालपर्यंत भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवायचे आहे, असं ठरवलं तर ते होऊ शकते, असे सूचक विधान केले. ते पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते.




भाजपासोबत गेलेले काही लोक कमळाच्या चिन्हावर लढतील, असे तुम्ही म्हणाले, तर अजित पवार हेदेखील कमळाच्या चिन्हावर निवडणूक लढतील, असं म्हणायचं आहे का? या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले, भाजपाची प्रवृत्ती आणि विचारसरणी बघितली तर त्यांना कुठलाही लोकनेता आवडत नाही. भाजपमधील जे-जे लोकनेते होते, त्यांना भाजपाने संपवले आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, पंकजा मुंडे, एकनाथ खडसे, अडवाणी यांची आज काय परिस्थिती आहे ते बघा. जे लोकनेते आणखी आहेत त्यांनादेखील भाजपा हळूहळू संपवत आहे. भाजपाला केवळ लोकसभेचे पडलेले आहे, बाकी काही नाही. उद्या असं होऊ शकतं की भाजपाच्या वरिष्ठांनी ठरवलं वरपासून खालपर्यंत भाजपाच्या चिन्हावर लढायचं तर ते होऊ शकतं, असे सूचक विधान त्यांनी केले. अजित पवार यांच्याबरोबर अनेकांनी भाजपासोबत जाण्याची भूमिका घेतली. अजित पवार यांना मी त्यांच्या कामामुळे आदरयुक्त घाबरतो. पण केवळ विचार बदलण्यासाठी जर कोणी दमदाटी केली तर मी कुणाला घाबरत नाही. म्हणून आम्ही शरद पवार यांचा विचार घेऊन तुमच्यासमोर आलो आहोत. शरद पवार यांचे एक मत आहे. भाजपाची खेळी होती. शिंदे गटाला फोडलं. शिंदे गट आणि ठाकरे गट वेगळा झाला. ते एकमेकांच्या विरोधात खालच्या पातळीवर जाऊन बोलायला लागले तेव्हा भाजपा एसीत बसून तमाशा बघत बसले. शरद पवार यांना ६० वर्षांचा राजकीय अनुभव आहे. तीच खेळी भाजपा जर आमच्यावर टाकत असेल तर शरद पवार हेदेखील भाजपाचे बाप आहेत. भाजपाला जे पाहिजे होते ते शरद पवार यांनी दिले नाही. भाजपा हे कुटुंब, पक्ष फोडण्यासाठी जबाबदार आहे, असा टोलादेखील त्यांनी लगावला.

### भाजपाला केवळ लोकसभेचे महत्व

» भाजपमधील जे-जे लोकनेते होते, त्यांना भाजपाने संपवले आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे, पंकजा मुंडे, एकनाथ खडसे, अडवाणी यांची आज काय परिस्थिती आहे ते बघा. जे लोकनेते आणखी आहेत त्यांनादेखील भाजपा हळूहळू संपवत आहे. भाजपाला केवळ लोकसभेचे पडलेले आहे, बाकी काही नाही. उद्या असं होऊ शकतं की भाजपाच्या वरिष्ठांनी ठरवलं वरपासून खालपर्यंत भाजपाच्या चिन्हावर लढायचं तर ते होऊ शकतं, असे सूचक विधान त्यांनी केले.

# पडळकरांना चोप दिल्याशिवाय राहणार नाही!

## पडळकरांच्या आक्षेपार्ह विधानामुळे पिंपरी चिंचवड अजित पवार गट आक्रमक



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना बोचरी टीका केली आहे. अजित पवार लबाड लांडग्याचं लबाड पिल्लू आहे, अशी टीका पडळकरांनी केली. पडळकरांच्या टीकेनंतर अजित पवार गट आक्रमक झाला असून कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी निदर्शनं केली आहेत. दरम्यान, संतप्त कार्यकर्त्यांनी गोपीचंद पडळकरांचा एकेरी उल्लेख करत घोषणाबाजी केली. तसेच गोपीचंद पडळकर जिथे दिसतील, तिथे त्यांना मारहाण केली जाईल, असा इशाराही अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांकडून दिला आहे. गोपीचंद पडळकर यांच्याविरोधात अंदोलन करताना अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी 'गोप्या पडळकरचं करायचं काय, खाली डोकं वर पाय, गोप्या पडळकर, हाय हाय अशी घोषणा दिल्या. गोपीचंद पडळकर हा नालायक आणि नीच प्रवृत्तीचा माणूस आहे. त्यांनी माफी मागितली तरी आम्ही त्यांना मारल्याशिवाय राहणार नाही, असा धमकीवजा इशारा राष्ट्रवादी युवा काँग्रेसच्या अध्यक्षांनी दिली आहे. गोपीचंद पडळकरांचा एकेरी उल्लेख करत राष्ट्रवादी युवा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणाले, गोप्या पडळकर या नालायकाने अपशब्द वापरले आहेत. हा इतका नालायक आणि नीच प्रवृत्तीचा माणूस आहे. प्रत्येक वेळी अजित पवारांवर टीका करायची आणि स्वत:ला मीडियामध्ये कसं मोठं करता येईल, अशा पद्धतीचा प्रयत्न गेली कित्येक वर्षांपासून आम्ही बघतोय. पण आता आम्ही ऐकून घेणार नाही. मी पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने सांगतो की, तो (गोपीचंद पडळकर) आम्हाला जिथे दिसेल तिथे आम्ही त्याला झोडणार (चोप देणार) आहोत. त्याला आता सुट्टी नाही. त्याने माफी मागितली तरी आम्ही त्याला झोडणार आहोत. येत्या दोन-चार दिवसात तो आम्हाला दिसणारच आहे. तो जिथे दिसेल तिथे आम्ही त्याला झोडल्याशिवाय राहणार नाही.

### गोपीचंद पडळकर काय म्हणाले?

» गोपीचंद पडळकर म्हणाले, धनगर समाजाबाबत अजित पवारांची भावना स्वच्छ नाही. ते लबाड लांडग्याचं लबाड पिल्लू आहे. अजित पवारांना आम्ही मानत नाही आणि कधी पत्रही दिलं नाही. पुढेही देण्याची आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे ज्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळू शकतो, अशा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आम्ही धनगर आरक्षणाबाबत पत्र दिलं आहे.

# पिंपरी-चिंचवड भाजपची जम्बो कार्यकारिणी जाहीर!

## जून्या-नव्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा भाजप कार्यकारिणीत समावेश




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहर भाजपची जम्बो कार्यकारिणी तब्बल दोन महिन्यानंतर रविवार (दि.१७ ) शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी जाहीर केली. यामध्ये दहा उपाध्यक्ष, सहा सरचिटणीस, दहा चिटणीस, एक कोषाध्यक्ष आणि सात मोर्चासह २५ सेलचे विविध पदाधिकारी आणि ६४ कार्यकारिणी सदस्य अशी 'जम्बो कार्यकारिणी' करुन त्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. भाजप पिंपरी चिंचवड अध्यक्षपदी शंकर पांडुरंग जगताप यांची निवड करण्यात आली आहे. शंकर जगताप यांनी भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. आगामी लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या शहर नेतृत्वाची धुरा शंकर जगताप यांच्याकडे सोपवली आहे. जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली होती. ते पोटनिवडणुकीतील भाजपच्या विजयाचे शिल्पकार ठरले होते. त्यामुळे त्यांच्याकडे शहराध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पार्टीला अच्छे दिन आले आहेत. चिंचवड मतदारसंघाचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे शहरातील भाजपचे पहिले आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांच्याकडे भारतीय जनता पार्टीने शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. या संधीचे सोने करत दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी २०१७ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपची प्रथमच सत्ता आणून दाखवली. त्यांनी स्पष्ट बहुमतासह महापालिकेत भाजपचे कमळ फुलवले होते.

**उपाध्यक्ष पदी –**

१ राजू अनंत दुर्गे (वरिष्ठ उपाध्यक्ष/ व पक्ष प्रवक्ते)
२ माऊली मुरलीधर थोरात
३ रवींद्र बाळकृष्ण देशपांडे
४ विनोद भवरलाल मालू
५ विशाल मनोहर कलाटे
६ सिद्धेश्वर बारणे
७ विभीषण बाबू चौधरी
८ पोपट सुखदेव हजारे
९ बाळासाहेब दिगंबर भुंबे
१० आशा दत्तात्रय काळे

सरचिटणीस पदी –

१ शितल गोरख शिंदे
२ अजय संभाजी पाताडे
३ शैला दामोदर मोळक
४ संजय उमाजी मंगोडेकर
५ नामदेव जनार्धन ढाके
६ विलास मडिगेरी

> “दरम्यान, भाजपच्या शहराध्यक्ष पदी शंकर जगताप यांची निवड झाल्यानंतर त्यांनी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील जून्या-नव्यासह निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांना कार्यकारिणीत समावून घेत काम करण्याची संधी दिली आहे. तब्बल दोन महिन्यानंतर भाजपची शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामुळे लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीसाठी ही जम्बो कार्यकारिणी जाहीर केल्याचे पहावयास मिळत आहे.
>
> – शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

**चिटणीस पदी –**

१ मधुकर बहिरू बच्चे
२ राजश्री जायभाय
३ गीता प्रवीण महेंद्रू
४ विजय जगन्नाथ शिनकर
५ सागर मुकुंद फुगे
६ कविता विनायक भोंगाळे
७ हिरेन अशोकभाई सोनावणे
८ देवदत्त गोविंदराव लांडे
९ विशाल प्रदीप वाळुंजकर
१० महेंद्र श्रीकृष्ण बाविस्कर

**कोषाध्यक्ष पदी –**

संतोष शंकर निंबाळकर

महिला मोर्चा (अध्यक्ष) – सुजाता सुनील पालांडे

सरचिटणीस महिला मोर्चा- वैशाली प्रशांत खाडये

युवा मोर्चा (अध्यक्ष) – तुषार रघुनाथ हिंगे

सरचिटणीस युवा मोर्चा – राज हेमंत तापकीर

किसान मोर्चा
संतोष भाऊसाहेब तापकीर

अनुसूचित जाती मोर्चा
भीमा सखाराम बोबडे

ओबीसी मोर्चा
राजेंद्र शंकर राजापुरे

आदिवासी मोर्चा
पांडुरंग लक्ष्मण कोरके

अल्पसंख्यांक मोर्चा
सलीम अब्दुल शिकलगार

# पुणे शहर भाजपची कार्यकारिणी जाहीर!

## गिरीश बापट यांची स्नुषा स्वरदा बापट यांना कार्यकारिणीत स्थान

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शहर भारतीय जनता पक्षाची शहर कार्यकारिणी सोमवारी जाहीर करण्यात आली. शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी कार्यकारिणी जाहीर केली असून कार्यकारिणीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या काही निकटवर्तीय कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. दिवंगत खासदार गिरीश बापट यांची स्नुषा स्वरदा बापट यांना कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे. शहर कार्यकारिणीत १८ उपाध्यक्ष, ८ सरचिटणीस, १८ चिटणीस यासह युवा मोर्चा अध्यक्ष, महिला मोर्चा अध्यक्ष, ओबीसी मोर्चा अध्यक्ष, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष आणि व्यापारी आघाडी अध्यक्ष अशी ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी विश्वास ननावरे, प्रशांत हरसुले, मंजुषा नागपुरे, जीवन जाधव, सुनिल पांडे, श्याम देशपांडे, प्रमोद कोंढरे, अरुण राजवाडे, तुषार पाटील, स्वरदा बापट, योगेश बाचल, भूषण तुपे, संतोष खांडवे, महेंद्र गलांडे, रूपाली धावडे, हरिदास चरवड, गणेश कळमकर, प्रतीक देसर्डा यांची निवड करण्यात आली आहे. वर्षा तापकीर, राजेंद्र शिळीमकर, रवी साळेगावकर, सुभाष जंगले, राघवेंद्र मानकर, पुनीत जोशी, राहुल भंडारे, महेश पुंडे यांची सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चिटणीसपदी कुलदीप साळवेकर, किरण कांबळे, किरण बारटक्के, अजय खेडेकर, आदित्य माळवे, राहूल कोकाटे, विवेक यादव, उदय लेले, विशाल पवार, लहू बालवडकर, उमेश गायकवाड, सुनील खांडवे, प्रवीण जाधव, हनुमंत घुले, रेश्मा सय्यद, अनिल टिंगरे, आनंद रिठे, दुश्यंत मोहोळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्षपदी करण मिसाळ, महिला मोर्चा अध्यक्षपदी हर्षदा फरांदे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष नामदेव माळवदे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष भीमराव साठे, अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्ष इम्तियाज मोमीन आणि व्यापारी आघाडी अध्यक्ष म्हणून उमेश शहा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहा वर्षापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेल्या काही माजी नगरसेवकांना ही कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे.



### यांची करण्यात आली नियुक्ती

» उपाध्यक्षपदी विश्वास ननावरे, प्रशांत हरसुले, मंजुषा नागपुरे, जीवन जाधव, सुनिल पांडे, श्याम देशपांडे, प्रमोद कोंढरे, अरुण राजवाडे, तुषार पाटील, स्वरदा बापट, योगेश बाचल, भूषण तुपे, संतोष खांडवे, महेंद्र गलांडे, रूपाली धावडे, हरिदास चरवड, गणेश कळमकर, प्रतीक देसर्डा यांची निवड करण्यात आली आहे. वर्षा तापकीर, राजेंद्र शिळीमकर, रवी साळेगावकर, सुभाष जंगले, राघवेंद्र मानकर, पुनीत जोशी, राहुल भंडारे, महेश पुंडे यांची सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# महावितरणचे वीजमीटर बदलणाऱ्या टोळीचा पर्दाफाश!

## चार जणांविरुद्ध चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
तुमच्याकडे लावलेले वीजमीटर संथ झाले आहे. कनेक्शन दिल्यापासून तुम्हाला लाखो रुपयांचे बिल भरावे लागेल. तुमचे वीजमीटर बदलून देतो व त्यासाठी काही रक्कम द्यावी लागेल' अशी बतावणी करून तसेच महावितरणचे कर्मचारी असल्याचे भासवून महावितरण व वीजग्राहकांचे लाखो रुपयांचे नुकसान करणाऱ्या टोळीचा चाकणमध्ये पर्दाफाश झाला आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. चाकण परिसरात काही ठिकाणी अज्ञात व्यक्ती महावितरणचे कर्मचारी असल्याची बतावणी करून वीजग्राहकांची आर्थिक फसवणूक करीत असल्याची कुणकुण महावितरणला लागली होती. यामध्ये हे तोतया कर्मचारी वीजग्राहकांशी थेट संपर्क साधून 'तुमचे मीटर संथ असल्याने मोठ्या रकमेचे बिल येणार आहे. ते न भरल्यास वीजपुरवठा खंडित होणार आहे' अशी भीती दाखवत आर्थिक लुबाडणूक करणे, जुने महावितरणचे मीटर काढून गहाळ करणे व त्याठिकाणी बाजारातून खरेदी केलेले मीटर ग्राहकांकडे लावत असल्याचे प्रकार होत असल्याची माहिती मिळाली. या प्रकारच्या माहितीची मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी गंभीर दखल घेतली. त्यांच्या मार्गदर्शनात पुणे ग्रामीण मंडलचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, राजगुरुनगर विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र येडके, चाकणचे उपकार्यकारी अभियंता विजय गारगोटे, सहायक अभियंता अविनाश सावंत यांनी कर्मचाऱ्यांसह संशयास्पद वीजमीटरची तपासणी सुरु केली. यामध्ये चाकण येथील नाणेकरवाडी, आंबेठाण रस्ता, माणिक चौक परिसरात काही ग्राहकांकडे वीजमीटर बदलले आहे परंतु त्याची महावितरणकडे त्यांची नोंद नाही किंवा जुने मीटर महावितरणकडे जमा केले नसल्याचे आढळून आले. याबाबत संबंधित वीजग्राहकांना विश्वासात घेत अधिक तपास केला असता परस्पर वीजमीटर बदलून देणारा आरोपी दयानंद पट्टेकर हा मीटर रीडिंग घेणाऱ्या अलमदाद कम्प्युटर एजंसीशी संबंधित असल्याचे उघड झाले. आरोपी पट्टेकर व अज्ञात तीन व्यक्तींनी महावितरणचे भरारी पथकाचे कर्मचारी असल्याचे भासवून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गेल्या ऑगस्ट महिन्यात तीन वीजग्राहकांकडील वीजमीटर परस्पर बदलून दिले. यामध्ये महावितरणचे सुमारे १ लाख २२ हजार २७७ युनिटचे म्हणजे १३ लाख २८ हजार २७० रुपयांचे नुकसान केले. याप्रकरणी महावितरणकडून चाकण पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार कलम १३६ व १३८ नुसार दयानंद पट्टेकर व तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### महावितरणचे १३ लाख रुपयांचे नुकसान

» संबंधित वीजग्राहकांना विश्वासात घेत अधिक तपास केला असता परस्पर वीजमीटर बदलून देणारा आरोपी दयानंद पट्टेकर हा मीटर रीडिंग घेणाऱ्या अलमदाद कम्प्युटर एजंसीशी संबंधित असल्याचे उघड झाले. आरोपी पट्टेकर व अज्ञात तीन व्यक्तींनी महावितरणचेभरारी पथकाचे कर्मचारी असल्याचे भासवून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गेल्या ऑगस्ट महिन्यात तीन वीजग्राहकांकडील वीजमीटर परस्पर बदलून दिले. यामध्ये महावितरणचे सुमारे १ लाख २२ हजार २७७ युनिटचे म्हणजे १३ लाख २८ हजार २७० रुपयांचे नुकसान केले.

### मोठ्या रकमेचे बिल येणार असल्याची भीती

» चाकण परिसरात काही ठिकाणी अज्ञात व्यक्ती महावितरणचे कर्मचारी असल्याची बतावणी करून वीजग्राहकांची आर्थिक फसवणूक करीत असल्याची कुणकुण महावितरणला लागली होती. यामध्ये हे तोतया कर्मचारी वीजग्राहकांशी थेट संपर्क साधून 'तुमचे मीटर संथ असल्याने मोठ्या रकमेचे बिल येणार आहे. ते न भरल्यास वीजपुरवठा खंडित होणार आहे' अशी भीती दाखवत आर्थिक लुबाडणूक करणे, जुने महावितरणचे मीटर काढून गहाळ करणे व त्याठिकाणी बाजारातून खरेदी केलेले मीटर ग्राहकांकडे लावत असल्याचे प्रकार होत असल्याची माहिती मिळाली.

# शंभर महाविद्यालयांना 'कारणे दाखवा'!

## सावित्रीबाई फुले विद्यापीठाने नॅक मूल्यांकनाबाबत बजावली नोटिस

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुमारे शंभर महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनाबाबत कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. त्यामुळे नॅक प्रक्रिया पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांना कारवाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षण संस्थांना नॅक मूल्यांकन करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक महाविद्यालयांनी त्याकडे दुर्लक्षच केले आहे. उच्च शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही फारसा परिणाम झालेला नाही. त्यामुळे नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्याचे आदेश विद्यापीठांना देण्यात आले आहेत. तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही कुलगुरूंची बैठक घेऊन नॅक मूल्यांकन प्रक्रिया न केलेल्या महाविद्यालयांची यादी करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. त्यात नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस बजावण्याची सूचना केली होती. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील जवळपास शंभर महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, की विद्यापीठाच्या प्रणालीत नॅक मूल्यांकनाची माहिती महाविद्यालयांना भरावी लागले. मात्र ४० ते ४२ महाविद्यालयांनी एकदाही नॅक मूल्यांकन केलेले नाही, तर ५० हून अधिक महाविद्यालयांनी पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांना कारणे नोटिस बजावण्यात आली आहे. महाविद्यालयांनी त्यांचा खुलासा सादर केल्यावर छाननी करून शासनाच्या निर्देशानुसार नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन नसलेल्या महाविद्यालयांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच महाविद्यालयांवरील कारवाईबाबतचा निर्णय घेतला जाईल.




### नॅक मूल्यांकन करणे बंधनकारक

» उच्च शिक्षण संस्थांना नॅक मूल्यांकन करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक महाविद्यालयांनी त्याकडे दुर्लक्षच केले आहे. उच्च शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही फारसा परिणाम झालेला नाही. त्यामुळे नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्याचे आदेश विद्यापीठांना देण्यात आले आहेत. तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही कुलगुरूंची बैठक घेऊन नॅक मूल्यांकन प्रक्रिया न केलेल्या महाविद्यालयांची यादी करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. त्यात नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस बजावण्याची सूचना केली होती.

# आशय संपन्न कलाच समाजाला योग्य दिशा दाखवेल!

## अभिनेते दिग्दर्शक गिरीश कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कलेमध्ये जर आशय असेल तर ती कला चिरकाल लक्षात राहते, परंतु सध्या मात्र समाज माध्यमाच्या काळात आशयापेक्षा सादरीकरणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे कलेचे अस्तित्वही मर्यादित राहिले आहे. कला जिवंत राहण्यासाठी त्याला योग्य शिक्षणाची गरज आहे, अशा प्रकारची आशय संपन्न कलाच समाजाला योग्य दिशा दाखवू शकते, असे मत अभिनेते आणि दिग्दर्शक गिरीश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सवाचे पारितोषिक वितरण गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. एरंडवणे येथील शैक्षणिक संकुलात महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे रजिस्ट्रार जी. जयकुमार, भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टसचे संचालक प्रा.शारंगधर साठे, यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्य विवेक रणखांबे, ज्येष्ठ निवेदक राजेश दामले यावेळी उपस्थित होते. एकूण २७ कला प्रकारांमध्ये घेतलेल्या या महोत्सवात विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सने १७ ट्रॉफी मिळून चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली. गिरीश कुलकर्णी म्हणाले, सध्या लवकर प्रसिद्धी मिळावी, यासाठी अनेक जण प्रयत्न करताना दिसत आहेत, परंतु असे करताना कलेतील आशय मात्र विसरून जातात, यामुळे कलेचे आयुष्य मर्यादित राहते. कोणत्याही कलेचे शिक्षण घेण्यासाठी काही ठराविक कालावधी लागतो परंतु ती पूर्णतः आत्मसात होतेच असे नाही. कोणतीही कला ही केवळ माणूस घडवत नाही तर एक प्रकारे समृद्ध समाज घडवत असते. आशयसंपन्न कला ही समाजाला नेहमीच मार्गदर्शक ठरते. आज विविध माध्यमातून समाजाला दुभंगण्याचे काम केले जात आहे, अशावेळी कलाकारच आपल्या कलेच्या माध्यमातून सर्व समाजाला एकसंध ठेवण्याचे काम करू शकतो, त्यामुळे भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स सारख्या संस्था आणि या संस्थांद्वारे आयोजित करण्यात येणारा युवा महोत्सवाची समाजाला अधिक गरज आहे, त्यामधूनच भविष्यातील समृद्ध समाज घडू शकेल, असा विश्वासही गिरीश कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केला प्रा. शारंगधर साठे म्हणाले, माणसाच्या संवेदना जागृत करण्यासाठी कलेची आवश्यकता असते. या महोत्सवाच्या माध्यमातून या कलांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी आणि त्यामधून केवळ कलाकारच नव्हे तर एक चांगले व्यक्ती घडावेत याची अपेक्षा आहे. कलेच्या माध्यमातून केवळ विद्यार्थीच घडत नाही तर त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी ही मदत होते.



### युवा महोत्सवाचे पारितोषिक वितरण

» भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सवाचे पारितोषिक वितरण गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. एरंडवणे येथील शैक्षणिक संकुलात महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे रजिस्ट्रार जी. जयकुमार, भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टसचे संचालक प्रा.शारंगधर साठे, यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्य विवेक रणखांबे, ज्येष्ठ निवेदक राजेश दामले यावेळी उपस्थित होते. एकूण २७ कला प्रकारांमध्ये घेतलेल्या या महोत्सवात विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सने १७ ट्रॉफी मिळून चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली.